करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.अॅड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com |

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.११४ | पाने-१२ | दि.१०/२/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.







# विकास करायचा असेलतर पायाभूत सुविधा मिळणे गरजेचे : आ.संजयमामा शिंदे

करमाळा : कोणत्याही क्षेत्राचा परिपूर्ण विकास करायचा असेलतर पायाभूत सुविधा मिळवल्या पाहिजेत तरच विकास होवू शकतो. वरवर कामे करून कधीही प्रगती होत नाही. त्यामुळे करमाळा मतदार संघाचा विकास करण्यासाठी आपण दीर्घकालीन उपयुक्त असणाऱ्या योजनांवर भर दिला आहे व ती कामे करत आहोत; असे आमदार संजयमामा शिंदे यांनी सांगितले.

तालुक्यातील विकासात्मक कारकिर्दीचा आढावा देताना आमदार शिंदे सा.कमलाभवानी संदेशशी बोलत होते. ते म्हणाले, की आमदार होण्यासाठी अनेकांना धडपड करावी लागते. विशेषत: १५-२० वर्ष संघर्ष करावा लागतो. माढा मतदार संघातून आमदार बबनदादा शिंदे यांना आमदार होण्यासाठी आमच्या वडिलानंतर २० वर्षे संघर्ष करावा लागला व नंतर ते आमदार झाले. मी त्या मानाने सुदैवी ठरलो. पहिल्या निवडणुकीत अपयश आले तरी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अनेक कामे करता आली. त्यानंतर सन २०१९ च्या निवडणुकीत मतदारांनी विश्वास टाकला व त्यामुळे मला काम करण्याची संधी मिळाली. सुरूवातीला महाविकास आघाडीला पाठींबा दिला. त्यामुळे सरकारच्या माध्यमातून अनेक कामांना पाठबळ मिळाले. पूर्वी वीजेच्या संदर्भात कामेच थांबलेली होती. तालुक्यातील शेतकऱ्यांची गरज पाहून मी



कात्रज, कोर्टी, कोळगाव येथे अॅडीशनल ट्रान्सफार्मर मंजुर केले आहेत. आवाटी येथे सबस्टेशन, पांडे येथे लोड असल्याने तेथे अॅडीशनल ट्रान्सफार्मर, कविटगाव येथे अॅडीशनल ट्रान्सफार्मर मंजूर केले आहेत. राजुरी, रावगाव येथेही सबस्टेशन मंजुर केले आहे. कात्रजचे काम पूर्ण झाले असून, कोर्टी येथील काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. पांडे येथील कामही लवकरच सुरू होत आहे. उर्वरित कामेही क्रमाक्रमाने पण वेळेत पूर्ण होतील. डिकसळ पुलाचे टेंडर निघालेले आहे. ते कामही लवकरच पूर्ण होईल. तालुक्यातील एमआयडीसी कार्यान्वीत होण्यासाठी अनेक वर्षाचा रखडलेला प्रकल्प म्हणून त्याकडे लक्ष दिले. तेथे रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाले आहे. पाण्याबाबत जोरदार प्रयत्न सुरू आहेत. प्लॉटिंगचे दर शासनाने २० लाख रूपये एकर काढले आहे, ते कमी होण्यासाठी शासनाच्या पाठीशी लागलो आहे.

जातेगाव ते टेंभूर्णी हा राष्ट्रीय मार्ग मंजूर केलेला आहे.दहिगाव उपसासिंचन योजनेचे पाणी कायमस्वरूपी शेतकऱ्यांना देण्यासाठी योग्य ते नियोजन सुरू आहे. मांगी तलावात कुकडीतून पाईपद्वारे पाणी देण्याचा प्रस्ताव शासनाकडे आहे. परंतू तो प्रस्ताव यशस्वी होण्यास काही अडचणी जाणवत आहेत. त्यामुळे कुकडीचे पाणी उजनी जलाशयात सोडून उजनीवरून (पान २ वर...)



शब्द शब्दच असतात, पण काही शब्द माणसं जोडतात आणि काही शब्द माणसं तोडतात !

## संपादकीय.................................!

# बोलावे असे काही..!

माणसं दररोज एकमेकांशी संवाद साधत असतात. हा संवाद जेव्हा योग्य मर्यादेपर्यंत असतो, तोपर्यंत संवाद राहतो आणि मर्यादा संपली की तेथे वाद सुरू होतो. बोलताना अनेकजण समोरचा माणूस दुखावला जाणार नाही व आपल्या विचाराचा करून घ्यावा यासाठी अटोकाट प्रयत्न करतो. पण... बोलता-बोलता प्रेमाच्या ऐवजी रागच उफाळून येतो. कारण समोरचा माणूस योग्य न बोलता तो चुकीचे बोलतो आणि त्यातून आपण आपला उद्देश विसरून आपल्या भावना दुखावल्या की त्याच्याच भाषेत बोलतो आणि गोंधळ उडून जातो. खरंतर समोरचा माणूस जेव्हा चिडतो, रागावतो, खोटं बोलतो अशावेळी संयम किंवा मौन पाळावे लागते. त्याचा पारा संपला की मग त्याला स्पष्ट शब्दात सुनवावे लागते. अनेकवेळा लोक विचार न करता मनाला येईल तसे बोलतात आणि त्यातून गोंधळ निर्माण होतो.

बोलताना आपण सहज, समजेल अशा शब्दात बोलणे आवश्यक असते. जड किंवा क्लिष्ट शब्द वापरले तर त्यातून योग्य परिणाम साधला जात नाही. संत तुकोबा म्हणतात.. "बोलू ऐसे बोल । जेणे बोले विठ्ठल डोले ।" म्हणजे असं बोलावं की समोरच्या माणसांनाही आपल्याबद्दल अधिक प्रेम वाटावं हा त्याचा अर्थ आहे. समाजात अनेक लोक स्वार्थ पोटामध्ये ठेवून गोड बोलतात. काम झालं की दूर होतात. या गोष्टीही आपल्याला कळल्या पाहिजेत. आपणाला स्तुती करणारे लोक आवडतात. आपण त्यांच्या प्रेमात पडतो. खरंतर जेव्हा समोरचा माणूस स्तुती करतो तेव्हा त्याचा काहीतरी उद्देश लपलेला आहे हे लक्षात येतले पाहिजे.

आपणाला कावळा आणि कोल्ह्याची गोष्ट माहित आहे. एकदा कावळ्याच्या तोंडात मांसाचा तुकडा होता. तो तुकडा पाहून कोल्ह्याच्या तोंडाला पाणी सुटले. कावळा झाडावर आणि कोल्हा खाली होता. कोल्ह्याने कावळ्याबरोबर संवाद सुरू केला. "कावळेदादा.. तुम्ही खूप सुंदर दिसता. तुमचा रंग काळा असलातरी तो तुम्हाला खूप शोभून दिसतो. तुमचं आकाशात उडणं हे गुरुडाच्या भरारीसारखं आहे. वगैरे.. वगैरे.. फक्त मला तुमचा आवज तेवढा ऐकायचा राहिला आहे. एकदा तुम्ही काहीतरी बोला की मला तुमच्या आवाजाबद्दल बोलता येईल." कोल्ह्याच्या तोंडून ऐकलेल्या स्तुतीने कावळा भारावून गेला आणि आपल्या तोंडात मांसाचा तुकडा आहे, हे विसरून तो चक्क गाणे गाऊ लागला व त्याच्या तोंडातील मांसाचा तुकडा खाली पडला. कोल्ह्याने तो तुकडा गट्टम केला आणि निघून गेला. समाजात अशाच प्रकारे खोटी स्तुती करून आपल्याकडून लाभ उठविणारे असतात. अशा शब्दांवर आपण लक्ष ठेवावे लागते.

आपण मात्र इतरांशी बोलताना त्याच्या चांगल्या गुणाची पारख करून त्याचे कौतूक केले पाहिजे. बोलताना समोरच्या माणसाचा योग्य अभ्यासही केला पाहिजे. त्याच्या काही बाबी आपणहून मांडल्यातर त्याला जास्त आनंद प्राप्त होतो. आपले संभाषण हे निष्कपट असले पाहिजे. कारण आपण काही हेतू ठेवून संभाषण केले तर कालांतराने समोरच्याला लक्षात येते. असे झालेतर आपल्याबद्दलचे मत कायमस्वरूप बदलते. बोलताना समोरच्या डोळ्यात डोळे घालूनच बोलले पाहिजे. समोरचा आपल्याकडं पाहून बोलत आहे आणि आपण खाली पाहून काहीतरी काम करत आहोत हे नैतिक तत्वात बसत नाही. नेहमी बोलण्यापूर्वी काय बोलायचे आहे याचा विचार केला पाहिजे. कारण धनुष्यबाणातून गेलेला बाण, जीवनातील गेलेला वेळ आणि मुखातून गेलेला शब्द याबाबी परत मिळत नाहीत. म्हणूनच कबीरजी म्हणतात.. "बोली बोल अमोल है । बोल सके तो बोल, पहिले अंदर तौल कर फिर बाहर खोल ।" म्हणजे प्रत्येक शब्द हा मोजून, मापून वापरलातर वादग्रस्त प्रसंग निर्माण होत नाहीत.

संत ज्ञानेश्वर म्हणतात.. "साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ।।" असे शब्द जिथे असतात तिथं प्रेम, औदार्य, जिव्हाळा, आपुलकी येते. कारण आपल्याकडे खऱ्या अर्थाने शब्द हेच भांडवल आहे. जगात कोणीही कोणालाही कोणतीही गोष्ट फुकट देत नाही. रस्त्यावरच्या माणसाला तांब्याभर पाणी दिल्यानंतर पुण्य मिळावं अशीच भावना माणसाची असते. म्हणून तुकोबाराय असं म्हणतात.. "आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।। शब्द आमच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोका ।। तुका म्हणे पहा शब्दची हा देव । शब्दची गौरव पुजा करू ।।" म्हणजे जन्माला आलेला माणूस आपल्या सोबत दुसऱ्यांना देण्यासाठी फक्त शब्द घेऊन आलेला आहे आणि तेच तो दुसऱ्यांना देऊ शकतो. पण आपण हे शब्द देतानाही चुका करतो आणि आयुष्याचे गणित बिघडून टाकतो.

असं म्हटलं जातं.. प्रेमाचा शब्द , स्नेहाचा स्पर्श, आपुलकीची नजर, कौतुकाची थाप, मदतीचा हात या गोष्टी फुकट मिळतात, पण माणूस यातही कंजुषपणा करतो. त्यामुळे जगण्यातील आनंद गमावून बसतो. त्यामुळे बोलताना आपण काय बोलत आहोत, याचा विचार करून बोलणे गरजेचे असते. त्यामुळे म्हणतात.. राग आल्यावर समोरच्याला बोलू नये आणि यश मिळाल्यावर लगेच आश्वासन देऊ नये. रस्त्यावर ज्याप्रकारे अपघात होतात म्हणजे आपण आपल्या साईडने जात आहोत, आपला वेग मर्यादित आहे. एवढेच नाहीतरसमोरच्याला पाहून आपण आपले वाहन उभे करतो, पण समोरचा येऊन वेगात धडक देऊन अपघात करतो. असंच काही शब्दांचं असतं. आपण संयमानं बोलावं, विचारपूर्वक बोलावं, समोरच्याला समजून घेऊन बोलावं पण समोरचा उगाचच चिडून बोलतो, शिव्य देतो, अपमानास्पद बोलतो. थोडक्यात हा एक अपघातच असतो. त्यामुळे अशावेळी आपल्या मनाचा संयम खूप सांभाळावा लागतो. नाहीतर मुद्यावरून गुद्यावर येण्यास वेळ लागत नाही. शब्दांनीच माणसं जोडली जातात आणि शब्दांनीच माणसं तोडली जातात. शब्दांनीच

माणूस माणसात बसतो आणि शब्दांनीच माणसातून उठतो. शब्दांनीच माणसावर फुलांची उधळण होते आणि शब्दानीच माणसावर दगडांचाही वर्षाव होतो. यामुळे शब्द हा किती महत्वाचा आहे हे लक्षात येतले पाहिजे. शब्द सामर्थ्यावर माजी आमदार जयवंतराव जगताप, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष काकासाहेब निंबाळकर, माजी मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, माजी उपमुख्यमंत्री कै.आर.आर.आबा पाटील अशी शेकडो माणसं तालुक्याच्या आणि राज्याच्या राजकारणात केवळ शब्दाच्या सामर्थ्यावर मोठी झालेली आहेत. यावरूनच शब्द सामर्थ्य लक्षात येते आणि म्हणून शब्द मोजून, मापून, आखून, निरखून आणि पारखून वापरणे गरजेचे आहे.

पान १ वरून पुढे...

## विकास करायचा असेलतर पायाभूत सुविधा मिळणे गरजेचे : आ.शिंदे

वाशिंबे, रिटेवाडी, मोरवड व केत्तूर, चिलवडी, सावडी असे दोन सिंचन योजना करण्याबाबत आपण प्रयत्नशील आहोत.

कुकडीचे पाणी गेल्या ३५ वर्षात शेतीसाठी मिळालेले नाही. वास्तविक पाहता कुकडीच्या माध्यमातून २४ हजार ५०० हेक्टर क्षेत्र हे ओलिताखाली येणार आहे. परंतू कुकडीच्या डाव्या कालव्यातून हे पाणी येऊ शकत नाही. कारण १९४ किलोमीटर नंतर करमाळा तालुका सुरू होतो व या अंतरात येईपर्यंत पाणी जवळपास वरच्या लोकांनी घेतलेले असते. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी मी व आमदार रोहित (दादा) पवार यांनी प्रयत्न करून कॅनॉलची दुरूस्ती केली आहे. त्यामुळे पूर्वी ३०० क्युसेसने येणारे पाणी ६५० क्युसेसने येऊ लागले आहे. कुकडीचे आवर्तन ९ ते १५ दिवसासापेक्षा जास्त मिळत नाही. साधारणत: एक महिना कॅनॉलने पाणी आल्यानंतर १ टीएमसी पाणी येते. जर आर्वतनच १५ दिवस असेल व त्यात कमी क्षमतेने पाणी येत असेलतर शेतीची तहान कशी भागणार ? यामुळे कुकडीचे पाणी उजनीत व उजनीतून उपसासिंचनद्वारे तालुक्यात आणण्याचा मानस असून आपण त्याकरीता प्रयत्न करत आहोत.

करमाळा तालुक्यातील वरीष्ठ स्तर न्यायालय उभा करण्यासाठी आपण जे प्रयत्न केले त्यास यश आले असून हे न्यायालय सुरू झाले आहे. याशिवाय कुकडी व दहिगाव योजनेसाठी संपादन झालेल्या जमिनीची नुकसान भरपाई मंजूर केली आहे. नगरपालिकेची बिल्डींग, टाऊन हॉलची बिल्डींग, १०० कॉटचे उपजिल्हा रूग्णालय अशी महत्वाची पायाभूत कामे आपण केलेली आहेत. केंद्रशासनाच्या वस्त्रोद्योग विभागाचे धोरण शिथील होताच तालुक्यात आपण वस्त्रोद्योगा बाबतचा व्यवसाय उभारण्याचे धोरण आहे.

तालुक्यातील जनसंपर्क मोहिमेत नागरीकांचा दांडगा संपर्क झाला आहे. कोणी टिका करो, अथवा पाठबळ देवो ही बाब माझ्या दृष्टीने महत्वाची नाही. परंतू गावागावातील नागरीकांच्या समस्या समजावून घेणे व त्या जितक्या लवकर सोडविता येतील त्या सोडविणे ही माझी जबाबदारी आहे. मध्यंतरी मुंबईला जास्त वेळ द्यावा लागत होता. आता सरकार बदलल्याने वेळ हाताशी असल्याने सर्वांना भेटून कामे समजून घेत आहे व यापुढेही कामे करणार आहे. नागरीकांनी आपल्या समस्या मधल्या माणसाला न सांगता थेट माझ्याशी संपर्क साधावा; असेही आवाहन आमदार संजयमामा शिंदे यांनी केले.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# जेऊर येथील भारत हायस्कुलच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा



करमाळा(सं.प्र.): जेऊर येथील भारत हायस्कुल मधील १९७९ च्या दहावीच्या तुकडीतील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला होता. ४३ वर्षांनी हे सर्व विद्यार्थी एकत्र आले होते. यावेळी माजी विद्यार्थी सेवानिवृत्त पाटबंधारे अभियंता प्रल्हाद कांबळे, डॉ.हनुमंत निर्मळ, श्रीकृष्ण कांबळे, राजकुमार राठोड, आझाद सय्यद, आबा झाडे, लक्ष्मण शिरसकर, कुंडलिक सोनवणे, डॉ.हरीपाल दुसेजा, श्रीकांत पाथुडकर, भारती पाथुडकर, शुभांगी पाथुडकर, शोभा लुणावत, रत्नमाला काळे, शोभा राठोड, पद्मावती माहुले, माजी प्राचार्य अनिल पाटील आदी आपल्या कुटूंबियासह कार्यक्रमास उपस्थित होते. शाळेचे संस्थापक/अध्यक्ष मु.ना.कदम यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरूवात झाली.

शाळेतील आठवणींनी सर्वच माजी विद्यार्थी गलबलून आले होते. यावेळी उपस्थित माजी विद्यार्थ्यांना चर्चा करत असताना आपल्या वर्गातील दत्ता वेदपाठक या मित्राची कौटूंबिक व आर्थिक आणि आजारपण विषयी माहिती मिळाली. या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या मित्राला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी तात्काळ मदत करण्याची घोषणा केली. आणि तात्काळ सर्वांनी वर्गणी गोळा करून वेदपाठक यांच्या कुटूंबाला आर्थिक मदत केली. यापुढे आपल्या मित्रांना कोणतीही अडचण आलीतर सर्व वर्गमित्रांनी एकत्र येत मदत करायचे ठरवले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रल्हाद कांबळे यांनी केले. यावेळी सिने दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी या माजी विद्यार्थ्यांची विचारपूस केली.

# एकनाथ शिंदे हे संवेदनशील मुख्यमंत्री : विलासराव घुमरे




करमाळा(सं.प्र.): मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अत्यंत संवेदनशील मुख्यमंत्री असून विशेषत: आरोग्याच्या प्रश्नात अडचणीत आलेल्या रूग्णाला मदत करण्याची त्यांची भावना व ते करत असलेले प्रयत्न यामुळे राज्यातील प्रत्येक रूग्णाला आपल्याला मदत करणारा कोणीतरी आहे. अशी विश्वासाची भावना एकनाथ शिंदे यांच्या रूपाने निर्माण झाली आहे; असे मत विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांनी व्यक्त केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त करमाळा उपजिल्हा रूग्णालय व श्री कमलाभवानी ब्लड बँकेच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी श्री.घुमरे बोलत होते. यावेळी बाळासाहेबांच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, तालुका प्रमुख देवानंद बागल, शहरप्रमुख संजय पाटील, युवा सेनेचे निखिल चांदगुडे, राहूल कानगुडे, विशाल गायकवाड, वैद्यकिय मदत कक्षाचे रोहित वायभसे, नागेश शेंडगे, शिवकुमार चिवटे, संजय जगताप, शिवसेना शाखाप्रमुख निलेश चव्हाण, पांडूरंग जाधव आदीजण उपस्थित होते.

मुस्लिम समाजाचे खंबीर नेतृत्व

दि ग्रेट बहुजन सम्राट

मै अकेला ही चला था, जानिबे मंजिल मगर।
लोग आते हि गये और कारवॉ बनता गया।।

**हाजी कलीम अ.रशिद काझी(सर)**
(संस्थापक/अध्यक्ष रहेनुमा चॅरिटेबल सोशल वेल्फेअर संस्था)


कलिम काझी सर

यांची दि करमाळा अर्बन बँकेच्या संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल

**हार्दिक अभिनंदन !**

शुभेच्छुक
**इसाक रमजान पठाण** (संस्थापक/अध्यक्ष - बहुजन विकास संस्था करमाळा.)
व्ही.आर.गायकवाड, लक्ष्मण भोसले, दिपक ओहोळ, अनिल बुद्रूक, अभिजीत मंडलिक

**रहेनुमा सोशल बचत गट :** एजाज अंगारशा, कय्युम शेख, ॲड.नईम काझी, ॲड.अलिम पठाण, अकबर सय्यद, इस्माईल शेख, शौकत शेख, मुबीन बागवान, फुरकान काझी, शरीफ दारूवाले, यासीन शेख, जाफर घोडके. **बहुजन विकास बचत गट :** जमीर शेख, इन्नुस पठाण, अशरफ तांबोळी, एजाज शेख, गुलाम सय्यद, इब्राहिम शेख, मकसूद बागवाान, सजन शेख, दस्तगीर बिल्डर, इलाही आत्तार, अलिम शेख, महंमद युसूफ मणेरी, बिलाल शेख, आशिष पठाण, जावेद पठाण
**अलसहारा सोशल ग्रुप :** हाजी समीर(बावा), अमीन बेग, तौफिक शेख, म.शरीफ शेख, राजू सय्यद

**ओजस हॉस्पिटल**
OJS HOSPITAL
AlIOPATHY AYURVED HOMEOPATHY

**डॉ.रोहन रामदास कुंभार**
B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ

**डॉ.मनोज रामदास कुंभार**
M.D. कन्सलटींग फिजीशीयन

**डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार**
B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट

* वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ *
* २४ तास अत्यावश्यक सेवा *

**डॉ.सौ.सायली मनोज कुंभार**
M.sc. Biotech, Health & Nutrition आहारतज्ञ

**ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी** शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार ● हृदयरोग व उच्च रक्तदाब ● मधुमेह ● थायरॉईड ● संधिवात ● पोटाचे आजार ● स्त्रियांचे आजार ● श्वसनसंस्थेचे आजार ● मणक्यांचे व हाडांचे विकार ● मुतखडा ● मुळव्याध ● सौंदर्य समस्या ● त्वचारोग व केशविकार ● आहारविषयक मार्गदर्शन..

उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)

पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. ● संपर्क : मो.9960334005, 9423333950

# कुंभारगाव येथे शिवमहापुराण कथा कार्यक्रम सुरू

## १८ फेब्रुवारीला स्थिर प्राणप्रतिष्ठाण व कलाशारोहण समारंभ

करमाळा (सं.प्र.) : श्री कुंभेश्वर (महादेव) मंदिर जीर्णोध्दार व महाशिवरात्री निमित्त कुंभारगाव येथे शिवमहापुराण कथा प्रेमयज्ञ तसेच स्थिर प्राणप्रतिष्ठाण व कलशारोहण समारंभ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवमहापुरण कथेचा शुभारंभ ८ फेब्रुवारीला शोभा यात्रा काढून व पोथी पुजनाने झाला असून, यावेळी भाविकांनी मोठी गर्दी केली होत. हा कार्यक्रम १८ फेब्रुवारी पर्यंत चालू राहणार आहे. शिवमहापुराण कथा कार्यक्रमात प.पू.श्री भार्गव मुनीषजी महाराज (श्रीधाम, अयोध्या) हे आपल्या वाणीतून कथा सांगणार असून, श्रीराम कथा मर्मज्ञ श्री सोनु पुजारीजी (श्रीधाम, अयोध्या) हे सांगणार आहेत. दहा दिवस चालू राहणाऱ्या शिवमहापुराण कथा कार्यक्रमात ९ फेब्रुवारीला शिवमहापुराण महात्मा, १० फेब्रुवारीला शिवनाम महिमा, ११ फेब्रुवारीला रुद्राक्षकथा, १२ फेब्रुवारीला शिवविवाह, १३ फेब्रुवारीला गणेश जन्म, १४ फेब्रुवारीला मा कालीमाता, १५ फेब्रुवारीला श्री रामकथा, १६ फेब्रुवारीला श्री लक्ष्मीनारायण विवाह, १७ फेब्रुवारीला बारह ज्योर्तिलिंग महाराज की विदाई व १८ फेब्रुवारीला शिवलिंग स्थापना, यज्ञ व महारूद्राभिषेक असे कार्यक्रम होणार आहेत. शिवमहापुराण कथा कार्यक्रमास येणाऱ्या भाविकांसाठी दररोज सायंकाळी सहा ते आठ महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

कुंभारगाव येथील श्री कुंभेश्वर (महादेव) मंदिराचा जिर्णोध्दार झाला असून, १८ फेब्रुवारीला या मंदिरात स्थिर प्राणप्रतिष्ठाण व कलशारोहण समारंभ होणार आहे. यानिमित्त १९ फेब्रुवारीला सकाळी ह.भ.प.सतीश महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर मुरलीधर फरतडे यांच्या सौजन्याने उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तरी करमाळा शहर व तालुक्यातील भाविकांनी शिवमहापुराण कथेचा लाभ घेण्यासाठी व मुर्ती प्राणप्रतिष्ठान व कलशारोहण कार्यक्रमास उपस्थित रहावे; असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक श्री कुंभेश्वर (महादेव) मंदिर सेवा समिती व कुंभारगाव ग्रामस्थांनी केले आहे.

# १३ फेब्रुवारीला गजानन महाराज प्रगट दिन कार्यक्रम

करमाळा (सं.प्र.) : श्री संत गजानन महाराज प्रगट दिनाचा कार्यक्रम १३ फेब्रुवारीला एस.टी.कॉलनी, करमाळा येथे आयोजित करण्यात आला आहे. या निमित्त १३ फेब्रुवारीला सकाळी सहा ते साडेसात श्री संत गजानन महाराज रूद्राभिषेक, आरती तसेच ह.भ.प.बाबूराव हिरडे यांचे किर्तन व श्री संत मुक्ताबाई भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी एक नंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. प्रगट दिनानिमित्त १० फेब्रुवारी पासून सकाळी १० ते १२ या वेळेत श्री संत गजानन विजयाचे पारायण सुरू असून त्याची सांगता १२ फेब्रुवारीला होणार आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा; असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600

**डॉ.डी.बी.केमकर**
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

उपलब्ध सुविधा...
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
● जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार ● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद

# विलासराव घुमरे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा





करमाळा(सं.प्र.) : विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांचा ६८ वा वाढदिवस यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.

श्री.घुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. यामध्ये ८० रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. तसेच महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचे कार्य केले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परवडेल अशा दरात शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे.. या हेतूने विद्यार्थी ग्राहक भांडाराचे उद्घाटन मकाई सह.साखर कारखान्याचे चेअरमन दिग्विजय बागल व युवा उद्योजक आशुतोष घुमरे यांचे हस्ते झाले. करमाळा नगरपरिषदेच्या वतीने शंभर वृक्ष महाविद्यालयास भेट देण्यात आले. गांडुळखता संदर्भात जनजागृती करणाऱ्या प्रकल्पाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणास वाव देणारा सांस्कृतिक कार्यक्रम या सर्व उपक्रमामध्ये लक्षवेधी उपक्रम ठरला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या अंगातील सुप्त कलागुणांबरोबर व्यायाम व मल्लखांबाचे सादरीकरण करून विद्यार्थी प्रेक्षकाची वाहवा मिळवली. यावेळी मकाईचे चेअरमन दिग्विजय बागल, उद्योजक आशुतोष घुमरे, डॉ.अविनाश घोलप, डॉ.रविकिरण पवार, एपीआय प्रविण साने, चिंतामणी जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मिलींद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, वरीष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.कॅप्टन संभाजी किर्दाक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ.विजय बिले, प्रा.डॉ.विनायक खरटमल, प्रा.कृष्णा कांबळे, प्रा.गौतम खरात, प्रा.सुधीर मुळीक, प्रा.प्रमोद शेटे, प्रा.लक्ष्मण राख, प्रा.नितीन तळपाडे, प्रा.विष्णू शिंदे, प्रा.सौ.सुजाता भोरे, प्रा.दीपक ठोसर, प्रा.श्रीकांत कांबळे, प्रा.लक्ष्मण राख, प्रा.हनुमंत भोंग, प्रा.मनोहर धिंदळे, प्रा.राम काळे, प्रा.सुवर्णा कांबळे, कार्यालयीन अक्षीक्षक संगीता नाईक, चंद्रकांत पाटील, नितीन कांबळे, निलेश भुसारे, गणेश वळेकर, तेजस् देमुंडे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## करमाळा तालुका खरेदी-विक्री संघावर जगताप गटाचे वर्चस्व

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका सहकारी कृषी खरेदी-विक्री संघाची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली असून, माजी आमदार जयवंतराव जगताप गटाचे सर्व सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत. १५ जागेसाठी लागलेल्या या निवडणुकीत १५ अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली. अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये माजी आमदार जयवंतराव जगताप, शंभुराजे जगताप, महादेव कामटे, महादेव डुबल, गोरख लबडे, रामदास गुंडगिरे, हनुमंत ढेरे, जनार्दन नलवडे, मज्जिद खान, शहाजी शिंगटे, सर्जेराव घरबुडवे, किशोर भगत, महेश कांबळे, नंदिनी जगताप, मनिषा धोंडे यांचा समावेश आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक दिलीप तिजोरे यांनी कामकाज पाहिले.खरेदी-विक्री संघावर स्थापनेपासूनच जगताप गटाचे वर्चस्व आहे. करमाळा तालुका खरेदी-विक्री संघाची स्थापना माजी आमदार कै.नामदेवराव जगताप यांनी केली असून, आजवर कै.नामदेवराव जगताप, माजी आमदार जयवंतराव जगताप, माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप यांनी चेअरमन पदाची धुरा सांभाळली आहे. जगताप गटाचे शंभुराजे जगताप यांची संचालक मंडळात वर्णी लागल्यामुळे त्यांची चेअरमन पदी निवड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## १२ फेब्रुवारीला पुरूषोत्तम खेडेकर यांचे व्याख्यान

करमाळा(सं.प्र.): शिवजयंतीनिमित्त मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरूषोत्तम खेडेकर यांचे 'छत्रपतीचे स्वराज्य हे समतेचे व न्यायाचे होते' या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम १२ फेब्रुवारीला दुपारी तीन वाजता यशकल्याणी सेवा भवन पुणे रोड, करमाळा येथे होणार आहे. शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार तळागाळापर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . तरी या कार्यक्रमास मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, समविचारी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन सचिन काळे, नितीन खटके, गणेश कुकडे यांनी केले आहे.


इथं सौंदर्य जन्म घेतं..
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा मो.9172092187
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
साड्यांचा भरपूर स्टॉक व भरपूर व्हरायटीमध्ये उपलब्ध !
घरगुती विक्रीसाठी साड्या होलसेल दरात मिळतील
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186





आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
fastrack
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रु. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२






सरपंच
माजी आमदार
माजी सरपंच






श्री.अनिल थोरात
अर्जुननगर-म्हसेवाडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी
श्रीमती चंद्रकला धनाजी भोगे
यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक





नटराज भोगे (प्रगतशील बागायतदार)

# अल्ताफशेठ तांबोळी यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा






करमाळा(सं.प्र.) : जय महाराष्ट्र पतसंस्थेचे चेअरमन, श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे संचालक व माजी नगरसेवक हाजी अल्ताफशेठ तांबोळी यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला.

अल्ताफशेठ तांबोळी यांच्या वाढदिवसानिमित्त करमाळा उपजिल्हा रूग्णालयातील रूग्णांना डॉ.अमोल डुकरे यांचे हस्ते फळे वाटप करण्यात आले. यावेळी अमीरशेठ तांबोळी, फारूक जमादार, हाजी फारूक बेग, समीर शेख, सद्दाम शेख, विनोद महानवर, साहिल वस्ताद, किरण शिंदे, ढाकणे सिस्टर, पठाण सिस्टर, रायपुरकर आदीजण उपस्थित होते. उर्दू प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना माजी नगरसेवक संजय सावंत यांचे हस्ते शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी, जमीर सय्यद, आनंद रोडे, वाजीद शेख, नागेश उबाळे, मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर उपस्थित होते. वाढदिवसा-निमित्त जय महाराष्ट्र मित्र मंडळ व टायगर ग्रुपच्या वतीने अल्ताफशेठ तांबोळी यांचा सत्कार करण्यात आला.

कमलादेवी औद्योगिक वसाहत येथे सायंकाळी सात वाजता तांबोळी मित्र परिवाराच्या वतीने अल्ताफशेठ तांबोळी यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक संजय सावंत, प्रशांत ढाळे, सावंत गटाचे नेते सुनील सावंत, सचिन घोलप, शिवसेना शहरप्रमुख प्रविण कटारिया, आदिनाथचे माजी चेअरमन संतोष पाटील, संजय शिंदे, दिनेश भांडवलकर, नितीन घोलप,सुनील बनसोडे, पांडूरंग जाधव, हाफीज कुरेशी, बाळासाहेब इंदुरे, संतोष गानबोटे, संतोष वारे, पिंटूशेठ गुगळे, ॲड.कमलाकर वीर, राजेंद्र चिवटे, राजेंद्र घाडगे यांच्यासह सर्व स्तरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## लव्हे येथील श्रीराम गोविंदराव पाटील यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : लव्हे येथील प्रगतशील बागायतदार व कर्मयोगी गोविंदबापू पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे संचालक श्रीराम गोविंदराव पाटील (वय-६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या मागे आई, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, भाऊ असा परिवार आहे. माजी आमदार नारायण(आबा) पाटील व युवक नेते राजू(आणा) पाटील यांचे ते बंधू होते.

त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते. माजी मंत्री दत्तात्रय मामा भरणे यांनी समक्ष भेटून पाटील परिवाराचे सांत्वन केले आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल कर्मयोगी पतसंस्थेच्या वतीने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी चेअरमन संजय गादीया यांचेसह सर्व संचालक व कर्मचारी उपस्थित होते.

## श्रीदेवीचामाळ येथील सीताबाई नामदेव चव्हाण यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील सीताबाई नामदेव चव्हाण यांचे वृध्दपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या मागे तीन मुले, सुना, नातू, नातवंडे असा परिवार आहे. दै.लोकमतचे वृत्तपत्र एजंट विजय चव्हाण, दिलीप चव्हाण, बापू चव्हाण यांच्या मातोश्री होत. त्यांच्यावर श्रीदेवीचामाळ येथील स्मशानभुमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रेमळ व मनमिळावू तसेच परखड मत व्यक्त करणाऱ्या सीताबाई चव्हाण यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.











॥ ॐ नम:शिवाय ॥ ॥ जय श्रीराम ॥ ॥ ॐ नम: शिवाय ॥
श्री कुंभेश्वर(महादेव) मंदिर, कुंभारगाव जीर्णोध्दार व महाशिवरात्रीनिमित्त
शिवमहापुराण कथा प्रेमयज्ञ
कथा प्रारंभ : बुधवार दि.८/२ ते शनिवार दि.१८/२/२०२३
वेळ : सायं ७.०० ते रात्री १०.०० पर्यंत
॥ श्री कुंभेश्वर मंदिर ॥
• दि.८ फेब्रु. : शोभा यात्रा व पोथी पुजन
• दि.९ फेब्रु. : शिव महापुराण महात्मा
• दि.१० फेब्रु. : शिवनाम महिमा
• दि.११ फेब्रु : रूद्राक्षकथा
• दि.१२ फेब्रु : शिवविवाह
• दि.१३ फेब्रु : गणेशजन्म
• दि.१४ फेब्रु : मा कालीमाता
• दि.१५ फेब्रु : श्री रामकथा
• दि.१६ फेब्रु : श्री लक्ष्मीनारायण विवाह
• दि.१७ फेब्रु : बारह ज्योर्तिलिंग महाराज की विदाई
• दि.१८ फेब्रु : शिवलिंग स्थापना, यज्ञ व महारूद्राभिषेक
टीप : मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी भाविकांनी सढळ हाताने आर्थिक मदत करावी, ही विनंती !
कथाव्यास
परमपुज्य श्री भार्गव मुनीषजी महाराज (श्रीधाम, अयोध्या)
श्रीराम कथा मर्मज्ञ
श्री सोनु पुजारीजी (श्रीधाम, अयोध्या)
सर्व ग्रामस्थ व भाविक भक्तांसाठी दररोज सायं ६ ते ८ महाप्रसादाची व्यवस्था केली आहे.
स्थिर प्राणप्रतिष्ठाण व कलशारोहण समारंभ
शनिवार, दि.१८/२/२०२३
तरी या कार्यक्रमाचा लाभ सर्व भाविक-भक्तांनी घ्यावा !
रविवार, दि.१९/२/२०२३ रोजी ह.भ.प.सतीश महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन, त्यानंतर श्री.मुरलीधर भगवान फरतडे यांच्या सौजन्याने महाप्रसाद होईल.
आयोजक • श्री कुंभेश्वर (महादेव) मंदिर सेवा समिती, कुंभारगाव • समस्त ग्रामस्थ, भाविक भक्त कुंभारगाव




संचालक, करमाळा अर्बन बँक
करमाळा भूषण
दि करमाळा अर्बन को.ऑप.बँक लि; च्या पंचवार्षिक निवडणुकीत देवी गटाचे
मा.श्री.चंद्रकांत चुंबळकर
यांची संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल तसेच देवी गटाचे बिनविरोध निवडलेल्या सर्व नूतन संचालकांचे
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
गणेश तरूण मंडळ
खडकपुरा गल्ली, करमाळा.





# एस.एस.के.एस. असोसिएटस्

## अकौंट मॅनेजर पाहिजेत

सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)

**पदासाठी अटी खालीलप्रमाणे..**

- **कामाची वेळ :** सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
- **पात्रता :** कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- **पगार :** ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

**संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)**

**पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टासमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.**

टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.







# पुणे-मुंबईकरांना करमाळेकरांचा हेवा...!

गेल्या आठवड्यात करमाळा येथील दिवाणी न्यायालयात वरीष्ठ स्तर न्यायालयाचे उद्घाटन समारंभ झाला. अतिशय भव्य व संस्मरणीय असा हा कार्यक्रम झाला. विशेष म्हणजे आपणा सर्वांना माहित होते, दत्तमंदिर ते विश्रामगृहापर्यंतचा रस्ता कसा होता. रस्त्यावर मोठमोठे खड्डे, धुळीचे लोट आणि सर्व काही अस्ताव्यस्त होते. न्यायालयातीलही अनेक अपूर्ण बाबी होत्या. जिल्हा न्यायाधीश डॉ.शब्बीर औटी यांनी याकामी लक्ष घातले व सार्वजनीक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.माळी यांना याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर श्री.माळी यांनी करमाळा येथील सहाय्यक अभियंता श्री.उबाळे यांना तशा सुचना दिल्या. त्यानंतर रस्त्याचा तात्पुरता प्रश्न, न्यायालयात परिसर स्वच्छता, न्यायालयातील न्यायकक्ष व अन्य खोल्यांची दुरुस्ती केली. मुख्य इमारतीच्या मधील भागात मुरूम टाकून सपाटीकरण करणे, त्या परिसरात उतरण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था आणि इतर काही की जे शक्य वाटत नव्हते ते अवघ्या एका आठवड्यात पुर्ण केले. अर्थातच याकामी करमाळा येथील न्यायाधीश सौ.मीना एखे व न्यायाधीश आर.ए.शिवरात्रे तसेच वकील संघाचे मार्गदर्शन व सहकार्य होते. आमदार संजयमामा




**माझी डायरी**

शिंदे यांनीही या अधिकाऱ्यांना कामासाठी योग्य त्या सुचना दिल्या होत्या. थोडक्यात या निमित्ताने न्यायालय इमारत व परिसराचा कायापालट झाला. त्यानंतर मुख्य कार्यक्रमही तेवढाच दिमाखात झाला.

उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी बोलताना नमूद केले की, माझ्या ३१ वर्षाच्या कालावधीत एवढा सन्मान कोठे झाला नव्हता. पुणे-मुंबईत व महाराष्ट्रात अन्यत्र जावून आलेल्या न्यायमुर्ती महोदयांना सुध्दा या कार्यक्रमाचे कौतुक करावे लागले. एवढेच नाहीतर जिल्यातील व अन्य जिल्ह्यातील न्यायाधीकारी व वकील मंडळीसध्दा हा कार्यक्रम पाहून भारावून गेले. सर्वात महत्वाचे म्हणजे पोथरे येथील दिलीप शिरगीरे यांच्या शनैश्वर मंडपने जो मंडप आणि परिसर सजवला होता, त्याला तोड नव्हती. पुर्वी अशा कार्यक्रमांना नगरवरूनच मंडप व ध्वनीक्षेपक यंत्रणा आणली जायची. पण श्री.शिरगीरे यांनी अतिशय भव्य मंडप लावले, व्यासपीठ उत्तम सजवले, ध्वनीक्षेपक यंत्रणा सुसज्ज ठेवली. सोफ्यापासून खुर्चीपर्यंत आणि रस्त्यावरील गालीच्यापासून ते भोजन मंडपापर्यंत सर्व काही सुसज्ज व आकर्षक बनवले होते. त्यातच निलेश भुसारे यांनी काढलेल्या रांगोळी, सुरताल विदयालयातील प्राचार्य बी.बी. नरारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केलेले स्वागतगीत, पोलीस पथकाचे बँड, ज्योती वाघमारे यांचे सुत्रसंचलन तर महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सीलचे माजी अध्यक्ष ॲड.मिलींद थोबडे यांनी केलेले भाषण याबाबीनी या कार्यक्रमात रंगत आणली.

एकंदरीत पुणे-मुंबईकरांना हेवा वाटावा इतका देखणा कार्यक्रम हा झाला, त्याचे बहुतांशी श्रेय वकील संघाच्या दृष्टीला व दिलीप शिरगीरे यांच्या मंडप व्यवस्थेला जाते. विशेष म्हणजे या कार्यक्रमाने श्री. शिरगिरे यांनी नाव व पैसा दोन्ही गोष्टी कमवल्या आहेत.

***

## बँक ऑफ इंडिया तर्फे जप्तीची कारवाई
### थकीत कर्जदारांचे धाबे दणाणले

करमाळा (सं.प्र.) : वीट येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखे तर्फे थकीत कर्जदारांवर जप्तीची कारवाई चालू झाली असून, थकीत कर्जाच्या वसुलीसाठी बँके तर्फे धडक कारवाई करण्यात येत आहे. बँकेच्या या जप्तीच्या कारवाईमुळे वीट बँकेच्या थकीत कर्जदारांचे धाबे दणाणले आहेत. कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी तात्काळ कर्जाची रक्कम भरून सहकार्य करावे; असे आवाहन वीट शाखेचे शाखाधिकारी विठ्ठल पाटील यांनी केले आहे.

थकीत कर्जाच्या वसुलीसाठी बँकांना तारण मालमत्ता विकून कर्ज वसुल करण्याचा अधिकार देण्यासाठी केंद्र सरकारने २००२ मध्ये सरफेसी हा कायदा आणला आहे. या कायद्याचा आधार घेऊन व कायद्याच्या तरतुदी अंतर्गत बँकेने थकीत कर्जाच्या वसुलीची मोहिम चालू केली आहे. बँक ऑफ इंडियाच्या वीट शाखेने ज्या कर्जदाराकडे थकीत कर्ज आहे, अशा कर्जाच्या वसुलीसाठी सरफेसी कायद्यानूसार कोर्टात धाव घेवून न्यायालय तर्फे मिळकतीचा ताबा घेण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक केली आहे. ७ फेब्रुवारी रोजी न्यायालयीन आयुक्तांच्या उपस्थितीत व बँक ऑफ इंडिया झोनल ऑफिस सोलापूर येथील अधिकृत अधिकारी व ऋण अधिकारी यांचे उपस्थितीत जप्त केलेल्या मालमत्तेचा ताबा घेऊन बँकेस सुपूर्त करण्यात आला आहे. थकीत कर्जदारांना वारंवार लेखी-तोंडी सांगूनही त्याची दखल न घेतल्याने व वेळेत रक्कम न भरल्याने बँकेने तारण मालमत्तेचा ताबा घेतला आहे. बँकेच्या या धडक कारवाईमुळे वीट बँकेचे थकबाकीदार कर्जदार धास्तावले आहेत. जप्तीची कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी जादा वेळ न घालविता आपली थकबाकी भरून बँकेस सहकार्य करण्याचे आवाहन बँकेचे शाखाधिकारी विठ्ठल पाटील यांनी केले आहे.

## पावणेसतरा वर्षाची मुलीला फूस लावून पळवून नेल्याची फिर्याद दाखल

करमाळा(सं.प्र.) : पावणेसतरा वर्षाच्या मुलीस अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून फूस लावून पळवून नेले आहे. अशी फिर्याद या मुलीच्या वडिलांनी ८ फेब्रुवारीला करमाळा पोलीसात दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझ्या घरी माझी आई व मुलगी (१६ वर्षे १० महिने) ही होती. मी सकाळी वरकटणे येथे नातेवाईकाच्या अंत्यविधीकरीता गेलो होतो. परंतू दुपारी दोन वाजता घरी आलो असता, मुलगी दिसून आली नाही. तिचा सर्वत्र शोध करूनही ती सापडून आली नाही. यावरून तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेले आहे. तिचे शिक्षण दहावी पर्यंत झाले असून अंगात पंजाबी ड्रेस, रंगाने सावळी, अंगाने सडपात, उंची १५५ सें.मी. अशा वर्णनाची ही मुलगी आहे.

या प्रकरणी पोलीसांनी पळवून नेल्याबाबतचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सागर कुंजीर हे करत आहेत.

## वायरमनच्या मृत्यूप्रकरणी तिघांविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : कंदर येथे वीज वितरण कंपनीचे काम करताना २८ वर्षाच्या वायरमनचे वीजेचा धक्का बसून जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना ६ फेब्रुवारीला सकाळी साडेअकरा वाजता घडली. या प्रकरणी तिघांविरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. यात पंडित कारभारी खोडवे (रा.येलडा, ता.अंबेजोगाई, जि.बीड) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझा चुलतभाऊ गोविंद बाबूराव खोडवे (वय-२८) हा अविवाहित असून तो कंदर येथे कंत्राटी तत्वावर वायरमन म्हणून काम करत होता. ६ फेब्रुवारीला तो कंदर येथे वीजेचे काम करत असताना तेथील विद्युत अभियंता यांनी व विद्युत ऑपरेटर किशोर नागनाथ तळेकर (रा.वांगी) यांनी ज्ञानदेव तुकाराम लोकरे यास बेकायदेशीर वीज चालू-बंद करण्याचे परमीट दिले. त्यानूसार माझा चुलतभाऊ काम करत असताना अचानक वीजपुरवठा सुरू झाला व धक्का बसून त्यात तो ठार झाला आहे. पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पो.उपनिरीक्षक माहूलकर करत आहेत

## शासकीय कामकाजात अडथळा - चौघांविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : अडविलेला रस्ता खुला करून देण्यासाठी आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना विरोध करून शासकीय कामकाजात अडथळा केल्याप्रकरणी चौघां विरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. हा गुन्हा न्यायालयाच्या आदेशानूसार नोंदण्यात आला आहे. यात रूक्मीणीबाई मनोहर गुरव (रा.शेटफळ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आडविलेला रस्ता खुला करण्याकामी तहसीलदाराने हुकूम दिल्यानंतर तलाठी, मंडल अधिकारी व दोन कॉन्स्टेबल ९ मार्च २०२१ रोजी शेटफळ येथे आले असता, त्यांना शासकीय कामकाज करण्याकामी हरिभाऊ धर्मा कांबळे, शालन हरिभाऊ कांबळे, मनोज हरिभाऊ कांबळे व अनिल हरिभाऊ कांबळे यांनी विरोध केला व काम होऊ दिले नाही. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रार दिली नाही. त्यामुळे या फिर्यादी महिलेने स्वत: न्यायालयात तक्रार दिली असून, न्यायालयाच्या आदेशानूसार चौघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेतीच्या कारणावरून मांगी येथे मारहाण एकमेकांविरूध्द फिर्याद दाखल

करमाळा(सं.प्र.) : कोर्टात चालू असलेली केस काढून घे.. मला माझी जमीन विकायची आहे, असे म्हणून तिघा जणांनी गजाने, हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आहे. अशी फिर्याद मधुकर रामचंद्र लांडगे यांनी दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी मांगी येथे राहत असून, माझे वडील रामचंद्र यांच्याकडून माझे मामा राजाराम बाबूराव अस्वले यांनी आम्हाला विश्वासात न घेता जमीन विकत घेतली आहे. याबाबत मी कोर्टात दावा दाखल केला असून तो दावा चालू आहे. ८ फेब्रुवारीला सकाळी साडेनऊ वाजता माझ्या शेतात घास कापीत असताना राजाराम अस्वले, त्याचा मुलगा अतुल अस्वले व पत्नी विमल अस्वले हे तेथे आले व तु तो दावा काढून घे.. मला जमीन विकायची आहे.. असे म्हणाले. त्यांनी माझ्या डोक्यात गजाने मारहाण करून जखमी केले. तसेच माझा पुतण्या आकाश हा सोडविण्यास आला असता, त्यालाही अतुल अस्वले यांनी मारले. तर माझी पत्नी व सुन सोडविण्यास आले असता, त्यांनाही विमल अस्वले यांनी मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी तिघांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

त्यानंतर शेतीच्या कारणावरून चौघांनी येऊन बेदम मारहाण केल्याची फिर्याद विमल राजाराम अस्वले (रा.वाघाचीवाडी, ह.रा.पुणे) यांनी पोलीसात दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की.. ८ फेब्रुवारीला सकाळी पुणेहून मी व माझे पती राजाराम अस्वले व मुलगा अतुल असे आम्ही आमचे शेतात सकाळी नऊ वाजता मांगी येथे गेलो. तेथे मधुकर लांडगे हा होता. त्यावेळी तो आम्हाला म्हणाला.. शेत माझे आहे. तुम्ही बाहेर जावा. त्यावेळी मी त्यास म्हणाले, की शेताचा उतारा दाखव. त्यावेळी त्याने नितीन लांडगे, वसंत लांडगे, सुंदराबाई मधुकर लांडगे (रा.हिवरवाडी) यांना बोलावून घेतले व आम्हाला त्यांनी हाताने व लाकडी काठीने मारहाण करून शिवीगाळ देऊन धमकी दिली आहे. या प्रकरणी पोलीसांनी चौघाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

# अर्जुननगर-म्हसेवाडी ग्रुप ग्रा.पं.च्या सरपंच पदी चंद्रकला भोगे



करमाळा (सं.प्र.) : अर्जुननगर-म्हसेवाडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या नूतन सरपंच पदी आमदार संजयमामा शिंदे व माजी आमदार जयवंतराव जगताप गटाच्या श्रीमती चंद्रकला धनाजी भोगे यांची बिनविरोध निवड झाली आहे. अर्जुननगर ग्रामपंचायत सरपंच पदासाठी ८ फेब्रुवारी रोजी निवडणूक झाली. या निवडणुकीत श्रीमती भोगे या बिनविरोध निवडल्या आहेत. यावेळी उपसरपंच त्रिंबक ननवरे, ग्रा.पं.सदस्य अश्विनी थोरात, मालन पवार, सोनाली ढवळे, अमोल पवार व अभिमन्यु दुधाळ उपस्थित होत्या. या



सर्वांनी चंद्रकला भोगे यांची सरपंच म्हणून बिनविरोध निवड केली आहे. निवडणूक अधिकारी म्हणून काझी, ठोंबरे व ग्रामसेवक लटके यांनी काम पाहिले. यावेळी प्रकाश थोरात, अनिल थोरात, राजू थोरात, दादा थोरात, मुकेश पाटोळे, फुलचंद भोगे, नटराज भोगे, सुरेश ढवळे, बापू ढवळे, गोरख भोगे, प्रविण भोगे, नामदेव खताळ, भाऊसाहेब अडसुळ, बळी अवसरे, माजी सरपंच ननवरे व लोखंडे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# हॉस्पीटलसमोरून मोटारसायकलची चोरी

करमाळा(सं.प्र.) : नेटके हॉस्पिटलसमोर लावलेली मोटारसायकल चोरट्यांनी चोरून नेली आहे. हा प्रकार ३० जानेवारीच्या मध्यरात्री घडला आहे. या प्रकरणी डॉ.बी.एम.नेटके यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझे शिवम् नावाचे हॉस्पिटल कृष्णाजीनगर येथे असून माझ्या हॉस्पिटल समोर एमएच ४५ डब्लू ८५८३ ही मोटारसायकल ३० जानेवारीला रात्री लावली होती. ३१ जानेवारीला सकाळी पाहिले असता, सदरची मोटारसायकल चोरीला गेल्याचे दिसून आले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल प्रशांत गायकवाड हे करत आहेत.

# देवळाली येथे शेतीपंपाची वीज दिवसपाळीला सोडण्याची मागणी



करमाळा(सं.प्र.) : देवळाली गावात बिबट्या आढळून आला असल्यामुळे देवळाली गावातील नागरीकात भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. तरी देवळाली गावातील शेतीपंपाची लाईट रात्रपाळी चालू असून ती लाईट दिवसपाळी करण्यासाठी वीज वितरण कंपनीचे अधिकारी जाधव यांना देवळाली ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी जाधव यांनी देवळाली शेतीपंपाची लाईट दिवस पाळीला सोडण्याचे आश्वासन दिले. यावेळी सरपंच गहिनीनाथ गणेशकर, उपसरपंच धनंजय शिंदे, ग्रा.पं.सदस्य पोपट बोराडे, बापू गुंड, संदीप चव्हाण, माजी सरपंच आशिष गायकवाड व ग्रामस्थ उपस्थित होते.



संचालक, अर्बन बँक



आमचे मित्र व सहकारी
**मा.श्री.गोरख जाधव** यांची
दि करमाळा अर्बन को.ऑप. बँकेच्या संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक
● आद्या पेट्रोलियम, जामखेड रोड, पोथरे
● राजोपाध्ये बंधू व परिवार, करमाळा.

प्रोप्रा : सागर वाघमारे Mo : 8600350856
शाखा नं.१०
**एम.टेक.डिस्ट्रीब्युटर्स**
**Sales & Services**
सर्व प्रकारच्या ॲक्सेसिरीज
ॲन्टीव्हायरस, वायफाय राऊटर, रिफिलींग, नेटवर्किंग इ. प्रकारची कामे करून मिळतील.
**होलसेल रेटनूसार साहित्य उपलब्ध !**
आमच्याकडे सर्व प्रकारचे
**कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही**
विक्री व दुरूस्ती करून मिळेल.
HP, DELL, ASUS, LENOVO, ACER, HIKVISION
CP-PLUS, EPSON, SAMSUNG
• जुने लॅपटॉप व संगणक मिळेल •



पत्ता
आदित्य प्लाझा, भवानीनाका, संताजीनगर, दुधे CT स्कॅन शेजारी, करमाळा.

**श्री जगदंबा टूर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स्**
पांडे, ता.करमाळा., जि.सोलापूर




आपल्या लाडक्या मुला-मुलीच्या लग्नाच्या शुभकार्यासाठी किंवा इतर समारंभासाठी ४० प्रवासी सीट असलेली टाटा बस
**भाड्याने मिळेल**
आमच्याकडे क्रुझर तसेच ईरटिगा व स्विप्ट डिझायर इ. गाड्या योग्य दरात भाड्याने मिळतील.

**करमाळा - पुणे - करमाळा डेली बससेवा**
लवकरच आपल्या सेवेत..!
जाण्याचा मार्ग : वीट, कोर्टी, कुंभारगाव, जिंती, भिगवण, हडपसर, स्वारगेट, शिवाजीनगर, काळेवाडी, डांगे चौक
● पार्सल सेवा व महिलांसाठी राखीव सीट
● वेळ : सकाळी ५ वा. ४५ मि.
● ठिकाण : करमाळा एस.टी.स्टॅन्ड समोर, हॉटेल मुक्ताई शेजारी., करमाळा.



संपर्क
प्रशांत कांबळे (9921404775 / 7057067003)
संतोष कांबळे (7741020164), किरण कांबळे (9822285691)

# करमाळा शहर युवक काँग्रेसच्या अध्यक्ष पदी सुजय जगताप

करमाळा(सं.प्र.): करमाळा शहर युवक काँग्रेस(आय) पक्षाच्या अध्यक्ष पदी सुजय यशवंतराव जगताप यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र माजी केंद्रीय गृहमंत्री व माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे यांचे हस्ते नुकतेच एका कार्यक्रमात देण्यात आले.

सुजय जगताप हे माजी आमदार कर्मवीर आण्णासाहेब जगताप यांचे नातू आहेत. करमाळा शहरात आण्णासाहेब जगताप गट अस्तित्वात असून, या गटाचे सुजय जगताप हे काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून राजकारणात वाटचाल करीत आहेत. कर्मवीर आण्णासाहेब जगताप यांची करमाळा नगरपरिषदेवर सत्ता होती. शहरात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. कर्मवीर आण्णासाहेब जगताप यांचेनंतर स्व.हरिभाऊ जगताप व स्व.ॲड.डी.पी.जगताप यांनीही नगरपालिके वर सत्ता स्थापित केली होती. त्यामुळे नगरपलिकेच्या राजकारणात या गटाला महत्व आहे. कर्मवीर आण्णासाहेब जगताप यांचेच सुजय जगताप हे वारसदार म्हणून त्यांचे नातू आहेत. सध्या ते काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रताप जगताप यांचेबरोबर काँग्रेस पक्षाचे काम पाहत आहेत. पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रश्नांवर आंदोलने केली असून अनेक प्रश्न सोडविले आहेत. याचीच दखल घेऊन जिल्हा काँग्रेस पक्षाने त्यांची करमाळा शहरा युवकची जबाबदारी दिली आहे. या निवडीप्रसंगी महेबूब शेख, उत्तरेश्वर सावंत, सचिन कटारिया, नितीन चिंचकर, सुजय जगताप, युवकचे जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार, विकी महानवर, गितेशे लोकरे, योगेश राखुंडे, सूरज जाधव, आदिनाथ खुटाळे, धर्मराज शिंदे, गणेश कोळी, संदेश माळवे, निखिल कदम आदी उपस्थित होते.



युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील, करमाळा तालुका अध्यक्ष प्रताप जगताप यांचे मार्गदर्शन व नेतृत्वाखाली करमाळा शहरात काँग्रेस पक्षाचे विचार घरोघरी पोहोचविण्यासाठी व शहराच्या समस्या सोडविण्यासाठी माझा प्रयत्न राहील. तसेच शहरात प्रत्येक प्रभागात युवक काँग्रेसच्या शाखा उघडण्यात येतील. **...सुजय जगताप**
**(शहराध्यक्ष, युवक काँग्रेस आय )**


## न्यु. प्रविण सुपर मार्केट

- बोल्ड नं.१ बदाम - ६०० रू. किलो
- नं.१ काजू - ७०० रू.किलो
- पिस्ता - २५० रू. पावकिलो
- मनुका - ६० रू. पावकिलो
- खजूर (डेटक्राऊ) - १४० रू अर्धाकिलो
- खजूर - ७० रू. अर्धाकिलो
- केळी वेफर्स - १०० रू. अर्धाकिलो
- जोडगहू - ६० रू. किलो
- पाणीपुरी - २५ रू. पावकिलो
- पॉपकॉर्न मका - ३० रू. पावकिलो
- मोहूरी(बारीक) - ८० रू. किलो
- महावीर पापड - ११० रू. अर्धाकिलो
- नाचणी - ५० रू.किलो
- खोबरं - १८० रू. किलो

**स्पेशल कडधान्य...**

- नवीन बेस्ट मटकी - ९० रू. किलो
- मटकी स्पे.गावरान - १२० रू. किलो
- काबोली(भारी) - ८० रू. किलो
- वटाणा हिरवा - ६० रू. किलो
- मुग(बारीक) - ८५ रू.किलो
- चवळी - ७० रू.किलो
- अख्खा मसुर - ७५ रू.किलो
- पाणीपुरी वटाणा - १०० रू. किलो
- शाबुदाणा(भारी) - ६५ रू.
- कोल्हापुरी राजमा - ७० रू. किलो

- नं.१ २१८९ गहू - ३५ रू.किलो
- ज्वारी(बेस्ट) - ५० रू.किलो
- नं.१ बाजरी - ३० रू.किलो

संपर्क
ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा
मो.9168052318



डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना **श्रीजय नेत्र रूग्णालय**

**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A

करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

**वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध**

**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

**श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३**







# भावपूर्ण श्रध्दांजली


श्रीमती आनंदमती नेमचंद दोशी


स्व.सौ.प्रेमलता महावीर दोशी

दि करमाळा अर्बन को.ऑप.बँकेचे संचालक श्री.राजकुमार दोशी व आडत व्यापारी श्री.अशोक नेमचंद दोशी यांच्या मातोश्री **श्रीमती आनंदमती नेमचंद दोशी** व बहिण **स्व.सौ.प्रफुलता महावीर दोशी** यांचे नुकतेच निधन झाले. दोशी कुटूंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची प्रार्थना !

शोकाकुल

श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित
**नवभारत इंग्लीश मिडियम स्कूल व ट्रिंक्लींग स्टार्स, करमाळा.**
श्री.कन्हैयालाल देवी, सौ.सुनिता कन्हैयालाल देवी

अध्यक्ष, गिरधरदास देवी प्रतिष्ठान



हार्दिक अभिनंदन

करमाळा भूषण



हार्दिक अभिनंदन

संचालिका, गिरधरदास देवी प्रतिष्ठान



दि करमाळा अर्बन को.ऑप. बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकी
बिनविरोध निवडलेल्या देवी गटाच्या सर्व नूतन संचालकांचे हार्दिक अभिनंदन !

**संचालक**


श्री.राजकुमार दोशी


श्री.दिलीप कटारिया


श्री.प्रकाश सोळंकी


श्री.महादेव फंड


ॲड.सुनील घोलप


श्री.अभिजीत वाशिंबेकर


श्री.गोरख जाधव


श्री.चंद्रकांत चुंबळकर


कलिम काझी


श्री.मोहिनीराज भणगे


सौ.प्रज्वला दोशी


सौ.आशा क्षीरसागर


सौ.वंदना कांबळे

**शुभेच्छुक**

श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित

## नवभारत इंग्लीश मिडियम स्कूल व ट्विंकलिंग स्टार्स, करमाळा



कै.राजशेखर षडाक्षरी पुराणिक

# भावपूर्ण श्रध्दांजली

जिथे टेकावा माथा
असे पाय आता निघून गेले
जिथे मिळावी सावली
असा वृक्ष आता उन्मळून गेला

आमचे मित्र अजय पुराणिक व संकेत पुराणिक यांचे पिताश्री

**राजशेखर षडाक्षरी पुराणिक**

यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.
त्यांचे परिवाराचे दु:खात आम्ही सहभागी आहोत.
ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच प्रार्थना !

**शोकाकुल**

## देवी प्लायवूड ॲन्ड हार्डवेअर

**देवी परिवार, मेनरोड, करमाळा. (9028075051, 9011524252)**


Indian Youth Congress
करमाळा शहर युवक काँग्रेस(आय) पक्षाच्या अध्यक्ष पदी
मा.श्री.सुजय यशवंतराव जगताप
यांची निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक :-
युवक काँग्रेस करमाळा शहर